सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577

**Website**: www.jdroamt.org **Email**: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/ 2391

दिनांक :- 24 AUG 2023

प्रति,

**प्राचार्य,**
सर्बधित औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- फॉर्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मान्यतेस अनुसरुन अभ्यासक्रमाच्या नावात बदल करण्यास शासन मान्यता देण्याबाबत.**

**संदर्भ :-** १.मा.कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन पत्र क्रमांक :- मान्यता २०२३/प्र.क्र.७१/तांशि ४ दिनांक १ ऑगष्ट २०२३.
२.मा.प्र.उपसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २/एनजीसी/एम.फॉर्मसी/२०२३/६९६ दिनांक ४ ऑगष्ट २०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे संदर्भिय १ चे शासन पत्रानुसार फार्मसी कॉन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून M.Pharmacy (Quality Assurance Techniques) व M.Pharmacy (Quality Assurance) या अभ्यासक्रमाच्या M.Pharmacy (Phrarmaceutical Quality Assurance) असा बदल करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच मा..प्र.उपसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे संदर्भिय पत्र क्रमांक २ अन्वये ज्या विद्यमान संस्थांमध्ये M.Pharmacy (Quality Assurance Techniques) व M.Pharmacy (Quality Assurance) या नावाचा शासन निर्णय जरी असला, मात्र पीसीआयच्या मान्यता पत्रात M.Pharmacy (Phrarmaceutical Quality Assurance) असे नाव असल्यास पीसीआय च्या मान्यता पत्रात नमुद केलेल्या अभ्यासक्रमाच्या नावानुसार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी सदर अभ्यासक्रमाचे नाव या कार्यालयाच्या स्तरावरुन मान्य करण्याबाबत उचित कार्यवाही करण्यास कळविलेले असून या कार्यालयाव्दारे सदर अभ्यासक्रमाचे नावामध्ये उचित कार्यवाही करण्यात आलेली आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील आपल्या लॉगिनमधुन सदर अभ्यासक्रमाची माहीती तपासून घेऊन सदर माहीती बरोबर आहे किंवा नाही याची तपासणी करावी. व त्यामध्ये काही तफावत असल्यास तसेच या कार्यालयास **दिनांक २५/८/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत** या कार्यालयास कळवावे. तसे आपण न कळविल्यास आपली माहीती बरोबर असल्याचे समजण्यात येईल. भविष्यात त्यामध्ये काही तफावत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यामुळे प्रवेश प्रक्रियेमध्ये काही अडचणी निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी आपली राहील, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

**(मनोज म अंधारे)**
सहा.संचालक (तांत्रिक)
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.